**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते छत्तीसगडमधे १४ हजार कोटीपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि पायाभरणी

- देशातली ७ राज्यं आणि २ केंद्रशासित प्रदेशांच्या स्थापनादिनानिमित्त आज विशेष कार्यक्रम

- देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत घट

- आंध्र प्रदेशच्या श्रीकाकुलम जिल्ह्यातल्या श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिरात चेंगराचेंगरी होऊन ९ जणांचा मृत्यू, अनेक जण जखमी

**आणि**

- भारताचा अग्रणी टेनिसपटू रोहन बोपण्णाची व्यावसायिक टेनिसमधून निवृत्ती

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी छत्तीसगढच्या दौऱ्यावर असून ते राज्यस्थापनादिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते छत्तीसगडमध्ये १४ हजार २६० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आज झाली. नवा रायपूर अटलनगर इथं छत्तीसगड विधानसभेच्या नव्या इमारतीचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. हरित इमारत संकल्पनेवर बांधलेली ही रचना सौरऊर्जेवर चालण्यासाठी तयार केली असून त्यात पावसाचं पाणी साठवण्याच्या व्यवस्थेचा समावेश आहे. माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचं अनावरणही मोदी यांनी केलं.

याखेरीज प्रधानमंत्र्यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेच्या शांतिशिखराचं तसंच वीर नारायण सिंग स्मारक आणि आदिवासी स्वातंत्र्यसैनिक

वस्तुसंग्रहालयाचं उद्घाटन केलं. श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयाला भेट दिली तसंच दिल की बात कार्यक्रमाद्वारे सुमारे अडीच हजार बालरुग्णांशी संवाद साधला.

**<><><><><>**

देशातली ७ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेश आज स्थापना दिवस साजरा करत आहेत. आंध्र प्रदेश, छत्तीसगड, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, आणि पंजाब ही राज्य तसंच लक्षद्वीप, आणि पुदुच्चेरी हे केंद्रशासित प्रदेश १ नोव्हेंबर रोजी स्थापन झाले. स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिथल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व राज्यांनी देशाच्या प्रगतीत उल्लेखनीय योगदान दिलं असून, त्याची विकास यात्रा सातत्याने नवी शिखरं पार करत राहो, अशी इच्छा राष्ट्रपतींनी व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

या सर्व ठिकाणी राज्य स्थापनादिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. पहिल्या टप्प्यातलं मतदान ६ नोव्हेंबर रोजी होणार असून मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सर्व पक्षांचे उमेदवार करत आहेत. या पार्श्वभूमीवर रालोआ आणि महाआघाडीच्या नेत्यांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत.

बिहारमधे रालोआची लाट असून यावेळीही राज्यात राओलाचंच सरकार स्थापन होईल, असा विश्वास लोकजनशक्ती पार्टी रामविलासचे प्रमुख चिराग पासवान यांनी व्यक्त केला. तर महाआघाडी गुन्हेगारांना पाठिंबा देत असल्याचा आरोप भाजपा खासदार मनोज तिवारी यानी केला. दुसरीकडे बिहारची जनता आपल्याला भरघोस पाठिंबा देत असून जनता महाआघाडीचं सरकार स्थापन करेल असा विश्वास भाकप महासचिव डी राजा यांनी व्यक्त केला.

<><><><><>

जीएसटी करप्रणालीत केलेल्या सुसुत्रीकरणानंतर ऑक्टोबर महिन्यातल्या जीएसटी संकलनानं गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ४ पूर्णांक सहा दशांश टक्के इतकी वाढ नोंदवली आहे. या सणासुदीच्या काळात १ लाख ९५ हजार कोटी रुपये इतकं जीएसटी संकलन झालं आहे. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत अर्थात एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ९ टक्क्यांनी वाढ झाली असून ते १२ लाख ७४ हजार कोटी रुपये इतकं झालं आहे. याशिवाय ऑक्टोबरमध्ये सलग दहाव्या महिन्यात जीएसटी संकलन १ लाख ८ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांच्या खरेदीला येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार असून त्यासाठी शेतकऱ्यांना ॲपद्वारे किंवा खरेदी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी करता येईल. या नोंदणीला ३० ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे तर अंतिम मुदत ३१ डिसेंबर आहे. खरेदीचा कालावधी १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी असेल. शेतकऱ्यांनी नजीकच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी कागदपत्रांसह अर्ज करावा आणि नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पणन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

भारतीय अन्न महामंडळाच्या महाराष्ट्रातल्या प्रादेशिक कार्यालयानं ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून ‘खुला बाजार विक्री योजने’ अंतर्गत तांदळाची विक्री सुरू केली आहे. खरेदीदारांनी अन्न महामंडळाच्या ई-लिलावात बोली लावावी, असं आवाहन महामंडळाने केलं आहे. येत्या ६ आणि ७ नोव्हेंबर रोजी तांदळाचा ई-लिलाव होणार असून, यासाठी एकूण १० हजार मेट्रिक टन

तांदूळ उपलब्ध केला जाईल, असं यात म्हटलं आहे. किमान बोली १ मेट्रिक टन, तर प्रति बोलीदार ७ हजार मेट्रिक टनांची कमाल मर्यादा आहे. अन्नधान्याच्या वाढत्या बाजारभावांवर नियंत्रण ठेवणं आणि खुल्या बाजारात पुरेशी उपलब्धता निर्माण करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणं, हे ‘खुला बाजार विक्री’ योजनेचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत आजपासून घट झाली आहे. घरगुती वापराच्या १४ किलो २०० ग्रॅम वजनाच्या एल पी जी सिलेंडरच्या किंमतीत मात्र कोणताही बदल झालेला नाही. व्यावसायिक वापराच्या १९ किलो वजनाच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत साडे चार ते साडे सहा रुपयांपर्यंत घट झाली असून यानुसार आता  मुंबईत हा सिलेंडर १ हजार ५४२ रुपयांना मिळेल.

<><><><>

आंध्र प्रदेशच्या श्रीकाकुलम जिल्ह्यातल्या श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिरात आज चेंगराचेंगरी होऊन किमान ९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी या दुर्घटनेतल्या मृतांना श्रद्धांजली वाहिली आणि जखमींना लवकर बरं वाटावं, अशी प्रार्थना केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करून मृतांच्या कुटुंबांना २ लाख रुपये नुकसानभरपाई, तर जखमींना ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यायची घोषणा केली. आंध्र प्रदेशचे राज्यपाल एस. अब्दुल नजीर, मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं.

<><><><>

६७ व्या  आकाशवाणी संगीत संमेलनाचं उद्या  दिल्ली, मुंबई आणि चेन्नई इथं उद्घाटन होणार आहे.  प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी सांगितलं की कोविड काळात खंड पडलेल्या या कार्यक्रमाला पुन्हा प्रारंभ

होईल. येत्या २९ नोव्हेंबरपर्यंत देशभरातल्या २४ आकाशवाणी केंद्रांवर हिंदुस्तानी, कर्नाटक तसंच पाश्चात्य शैलीतलं शास्त्रीय संगीत तसंच सुगम आणि लोकसंगीत कलाकार सादर करणार आहेत. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार आणि प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांचं पथक आपली कला सादर करणार आहेत.

**<><><><><>**

मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीनं आज मुंबईत ‘सत्याचा मोर्चा’ काढला आहे. या मोर्चात जेष्ठ नेते शरद पवार यांच्यासह माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, माकपचे राज्य सचिव डॉ अजित नवले, भापकचे सुभाष लांडे सहभागी झाले आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर लोकांच्या मनात संसदीय लोकशाहीबद्दल अविश्वास निर्माण झाला असून सत्तेचा सातत्याने गैरवापर केला जात आहे, असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला.

**<><><><><>**

भारतीय संरक्षण लेखा सेवेचे १९९० च्या तुकडीचे अधिकारी, विश्वजित सहाय यांनी आज संरक्षण लेखा महानियंत्रक म्हणून पदभार स्वीकारला. सहाय यांनी ब्रिटनमधलं केम्ब्रिज विद्यापीठ आणि जर्मनी इथलं जॉर्ज सी. मार्शल युरोपियन सेंटर फॉर सिक्युरिटी स्टडीज यासह विविध आंतरराष्ट्रीय मंचांवर भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. त्यांनी संरक्षण लेखा विभागासह भारत सरकारमध्ये विविध महत्वाच्या पदांवर काम केलं आहे.

**<><><><><>**

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कॅर्नी यांनी टॅरिफ विरोधी राजकीय जाहिरातीबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे दिलगिरी व्यक्त केली असून ऑन्टेरियोचे प्रमुख ड्युग फोर्ड यांना जाहिरातीचे प्रक्षेपण न करण्याची सूचना केली आहे. आपण ट्रम्प यांच्याकडे खासगीत दिलगिरी व्यक्त केल्याची माहिती कॅर्नी यांनी दक्षिण कोरियात आज आशिया पॅसिफिक बैठकीनंतर वार्ताहरांना दिली.

<><><><><>

इजिप्तनं गिझाच्या ग्रेट पिरॅमिडजवळचं ‘ग्रँड इजिप्शियन म्युझियम’ पर्यटकांसाठी खुलं केलं आहे. हे जगातलं सर्वात मोठं पुरातत्व संग्रहालय असून, या ठिकाणी ७ हजार वर्षांपूर्वीचा कालखंड उलगडणाऱ्या एक लाख कलाकृती प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.

<><><><><>

भारताचा अग्रणी टेनिसपटू रोहन बोपण्णा यानं व्यावसायिक टेनिसमधून निवृत्ती जाहीर केली आहे. बोपण्णानं समाजमाध्यमावर ही घोषणा केली आहे. २० वर्षांच्या कारकिर्दीनंतर आता आपण रॅकेट खाली ठेवण्याची वेळ आल्याचं त्यानं म्हटलं आहे.

<><><><><>

आयसीसी एकदिवसीय महिला क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत उद्या भारत आणि दक्षिण आफ्रिकेत नवी मुंबईत अंतिम सामना रंगणार आहे. दुपारी ३ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

//<><><><><>//